नांदेडमध्ये तांदूळ, डाळीच्या दरात घसरण

ऐन सणासुदीच्या काळात दर घटल्याने नागरिकांना दिलासा

नांदेड : नांदेडमध्ये तांदूळ, डाळीच्या किंमतीमध्ये क्विंटलमागे ५०० रूपयांनी घसरण झाली आहे. ऐन सणासुदीच्या काळात हे दर कोसळल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. दरम्यान, बाजारपेठेत सध्या मंदी असल्याने दर घसरल्याचे व्यापाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.

मागील काही दिवसांपासून दैनंदिन वस्तूंसोबतच पालेभाज्यांच्या दरवाढीमुळे गृहिणींचे बजेट कोलमडले होते. रोजचा दिवस काढणे सर्वसामान्यांना अवघड जात आहे. दरम्यान, जिल्ह्यात सध्या बऱ्यापैकी पाऊस झाला असून, पिकांची स्थितीही चांगली आहे. परंतु, बाजारपेठेत अजूनही म्हणावी तशी खरेदीसाठी रेलचेल दिसून येत नाही. दरम्यान श्रावण महिना सुरू झाला असून लवकरच सणांना सुरुवात होणार आहे. या अशा ऐन सणासुदीच्या काळात तांदूळ, डाळींच्या दरात घट झाली आहे. मंदीचा परिणाम तांदूळ, तूर, मूग, चना, उडीद डाळी, ज्वारी यांचे दर घसरणीवर झाला आहे.

यापूर्वी तूरीचा दर १८ हजार रूपये प्रति क्विंटल होता. आता १६ हजार ५०० ते १७ हजार रूपये क्विंटल झाला आहे. चनादाळ आधी साडे सात हजार ते आठ हजार रूपये क्विंटल होती. आता, सात ते साडे सात हजार रूपये क्विंटल आहे. मूग डाळ आधी अकरा हजार रूपये क्विंटल होती. आता दहा हजार २०० ते दहा हजार ५०० रूपये क्विंटल आहे. उडिद दाळ आधी १४ हजार रूपये होती. आता १३ हजार रूपये क्विंटल झाली आहे. तसेच डिबीटी तांदूळ आधी ४ हजार ७०० होता. आता ४ हजार ४०० ते ४ हजार ५०० रूपये क्विंटल आहे. एमएमटी आधी सहा हजार होता. आता ५ हजार ५०० रूपये क्विंटल, कोलम ७ हजार २०० होता, आता ७ हजार रूपये क्विंटल झाला आहे, असे व्यापारी कमलाकर बोंडे यांनी सांगितले.

हमालांची मजुरी घटली

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मोंढा बाजारपेठेत सध्या ग्राहकांची रेलचेल नाही. तसेच म्हणावी तशी खरेदी नसल्याने हमालांची मजूरी घटली आहे. बाजार समितीत ४०० ते ५०० हमाल असून, रोज त्यांना ५०० ते हजार रूपये मजूरी मिळते. परंतु, सध्या २०० रूपये इतकीच मजूरी मिळत असल्याचे हमाल टिपू मुकादम यांनी सांगितले. तसेच लोडींग ऑटोरिक्षाचे ग्राहक नसल्याने भाडेही कमी झाले असल्याचे सांगण्यात आले.

गिरणा धरणाचा पाणी साठा ४० टक्क्यांवर

नाशिकचा पूर जळगावच्या पथ्यावर

जळगाव : नाशिकमध्ये गेल्या ४८ तासांत मोठ्या प्रमाणावर पाऊस पडल्याने गिरणा नदीला पूर आला. त्यामुळे तेथील जनजीवन विस्कळीत झाले असले तरी हा पूर जळगाव जिल्ह्यासाठी फायदेशीरच ठरला आहे. पाण्यासाठी जिल्ह्यातील सात तालुके अवलंबून असलेल्या गिरणा धरणाच्या साठ्यात यामुळे वाढ होऊन आज तो साठा ४० टक्के झाला आहे. त्यामुळे प्रशासनाला मोठा दिलासा मिळाला आहे.

उत्तर महाराष्ट्रातील सर्वात मोठे धरण म्हणून गिरणा नदीवरील गिरणा धरण ओळखले जाते. या धरणावर जळगाव जिल्ह्यातील सात तालुके अवलंबून आहेत. तर नाशिक जिल्ह्यातील मालेगाव महापालिका, नांदगाव नगरपालिका, जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव, पाचोरा, भडगावसह दहा पालिका चाळीसगाव एमआयडीसी, १३० पाणी पुरवठा योजना, १७४ गावे पिण्याच्या पाण्यासाठी अवलंबून आहेत. या धरणाची साठवण क्षमता १८.४७ टीएमसी एवढी असून हे धरण १९६५ पासून केवळ बारा वेळा पूर्ण क्षमतेने भरले आहे. पावसाळ्याला सुरवात होऊन देखील आतापर्यंत धरणात केवळ ११ टक्के पाणीसाठा होता. या धरणाच्या वरच्या बाजूला नाशिक जिल्ह्यात पाच धरणे बांधली गेली आहेत.

त्यामुळे ही धरणे पूर्ण भरल्यानंतरच गिरणा धरणात पाण्याची आवक सुरू होते. नाशिक जिल्ह्यात नुकत्याच आलेल्या पुरामुळे गिरणा धरणावरील पाचही धरणे भरली गेल्याने त्यातून पाणी सोडण्यास सुरूवात झाली. परिणामी गिरणा धरणात पाणी येण्यास सुरुवात होऊन दोन दिवसांत गिरणा धरणात ४० टक्के पाणीसाठा झाला असल्याचे गिरणा पाटबंधारे विभागचे कार्यकारी अभियंता देवेंद्र अग्रवाल यांनी सांगितले.

पाचव्या मजल्यावरून श्वान अंगावर पडल्याने चिमुकलीचा अंत

मुंब्र्यातील हृदयद्रावक घटना; घटनेचे सीसीटीव्ही फुटेज व्हायरल

ठाणे : रस्त्यावरून पायी जात असताना पाचव्या मजल्यावरून अंगावर श्वान पडून चिमुकलीचा दुर्दैवी अंत झाल्याची हृदयद्रावक घटना मंगळवारी दुपारी मुंब्रा परिसरात घडली. हा श्वान पडल्यानंतर या चिमुकलीला तत्काळ रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषीत केले. या प्रकरणी मुंब्रा पोलिसांनी आकस्मित मृत्यूची नोंद केली असून संबंधित व्यक्तींकडे श्वान पाळण्याची परवानगी होती का ? याबाबत पालिका प्रशासन आणि पोलिसांनी तपास सुरू केला आहे. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज व्हायरल झाले असून अशा प्रकारे चिमुकलीचा अंत झाल्याने नागरिकांकडून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

मुंब्र्यातील अमृत नगर परीसरातील रस्त्यावरून सना बानो ही चार वर्षांची चिमुकली मंगळवारी दुपारी दीड वाजताच्या सुमारास आईसोबत पायी चालली होती. त्यावेळी चिराग मेन्शन या इमारतीच्या पाचव्या मजल्यावरून सनाच्या अंगावर लॅब्रेडॉर प्रजातीचा पाळीव श्वान पडला. यामुळे तिच्या डोक्याला आणि शरीरातील अंतर्गत भागांमध्ये मार लागल्याने ती गंभीर जखमी झाली. तिला उपचारासाठी तातडीने नजीकच्या रुग्णालयात आणि नंतर कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात नेण्यात आले. तेथील डॉक्टरांनी तिची तपासणी करून ती मृत झाल्याचे घोषीत केले. तिच्या आईने घडलेल्या प्रकरणाबाबत कुणावरही संशय अगर कुणाच्याही विरोधात तक्रार नसल्याचा जवाब पोलिसांना दिला आहे. या घटनेत हा श्वानही जखमी झाला असून, प्राणी मित्रांनी त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. याप्रकरणी मुंब्रा पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

वांद्रे-वेलंकनी ट्रेनचे बुकिंग शुक्रवारपासून

वसई : दक्षिण भारतातील प्रसिद्ध ख्रिस्ती देवस्थान वेलंकनी येथे जाणाऱ्या भक्तांसाठी पश्चिम रेल्वेने सालाबाद प्रमाणे विशेष जादा ट्रेन उपलब्ध केल्या असून, त्यांच्या आरक्षणाचे बुकिंग शुक्रवारपासून सुरू होणार आहे. स्पेशल ट्रेन क्रमांक ०९०९३ दि. २७ ऑगस्ट व ६ सप्टेंबर रोजी वांद्रे ते वेलंकनी व वेलंकनीहून परतीसाठी वेलंकनी ते वसई-वांद्रे साठी दि. २९ ऑगस्ट व ८ सप्टेंबर रोजी ट्रेन क्रमांक ०९०९४ देण्यात आलेल्या आहेत.

वसईत काँग्रेसचे 'लाडका खड्डा आंदोलन'

महापालिका प्रशासनाचा केला निषेध

वसई : शहरात ठिकठिकाणी रस्त्यांच्या झालेल्या दुरवस्थेबद्दल महापालिका प्रशासनाचा जाहीर निषेध करण्यासाठी काँग्रेसच्या वतीने वसई विरार शहर महापालिका प्रशासनाविरुद्ध वसई रोड पूर्वेला एव्हरशाईन नगरी गेट येथे "आमचा लाडका खड्डा आंदोलन" करण्यात आले. जिल्हा काँग्रेसच्या सामाजिक न्याय विभागाचे प्रदेश सचिव आश्रफ अली यांच्या पुढाकाराने आणि वसई विरार शहर जिल्हा काँग्रेस यांच्या वतीने जिल्हाध्यक्ष ओनिल आल्मेडा यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.

यावेळी प्रदेश काँग्रेसचे किरण शिंदे, विल्फ्रेड डिसोझा, अरनॉल्ड जुगल, अश्रफ अली, सर्फराज नंदा, आनंद चव्हाण, स्वामी, देव आशिष, राधा अय्यर, ट्रिसा बिसारा, पक्षाचे जिल्हा पदाधिकारी, महिला आघाडी, विविध सेल व विभाग, युवा काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आमचा लाडका खड्डा अशी घोषणा देत महापालिका प्रशासनाचा जाहीर निषेध करत आंदोलन करण्यात आले. यावेळी ढोल ताशा वाजवून जनजागृती व महापालिका प्रशासनाचे वाभाडे काढले.

बैलजोडीविना यंदा श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीचे आगमन आणि विसर्जन

उत्सव प्रमुख पुनीत बालन यांची घोषणा

पुणे : सार्वजनिक गणेशोत्सवाची मूहर्तवेढ रोवणाऱ्या हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती बापाच्या आगमन आणि विसर्जन मिरवणुकीसाठी रथाना यापुढे बैलांचा वापर करणार नाही. उत्सव प्रमुख व विश्वस्त पुनीत बालन यांनी ही घोषणा केली आहे. त्यामुळे तब्बल १३३ वर्षांपासूनची परंपरा आता खंडित होणार असली तरी मुक्या प्राण्यांचे हाल होऊ नये यासाठी हा निर्णय घेतला असल्याचे बालन यांनी स्पष्ट केले.

श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्टच्या उत्सव मंडपाचे वासापुजन सहपोलीस आयुक्त रंजन कुमार शर्मा यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना पुनीत बालन म्हणाले की, यंदाच्या वर्षी वरद विघ्नेश्वर वाडा ही सजावट गणेशोत्सवाच्या निमित्ताने करण्यात येणार आहे. यावर्षी १८९२ पासून चालत आलेली परंपरा प्रथमच बदलून भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्टच्या आगमन व विसर्जन मिरवणुकीत बैल जोडी न वापरण्याचा निर्णय ट्रस्टने घेतला आहे. विसर्जन मिरवणुकीला विलंब होतो, त्यामुळे रथ ओढणाऱ्या बैलांचे हाल होतात. मुक्या प्राण्यांचे हाल होऊ नये यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे आगमन मिरवणुकीत बाप्पाचा रथ ट्रस्टचे कार्यकर्ते व भक्त ओढतील व विसर्जन मिरवणुकीसाठी एक खास रथ तयार करण्यात येणार आहे. त्यामध्ये श्रींची मिरवणूक निघणार असल्याचे पुनीत बालन यांनी सांगितले. याप्रसंगी बोलताना सह पोलीस आयुक्त रंजन कुमार शर्मा म्हणाले की, या उत्सवासाठी पुणे पोलिसांची जी काही मदत लागेल ती करण्यासाठी आम्ही तत्पर आहोत.

दिव्यांग, शेतकऱ्यांसाठी प्रहारचा शुक्रवारी आक्रोश मोर्चा

आ. बच्चू कडू यांच्या नेतृत्वात दोन लाख कार्यकर्ते धडकणार

छत्रपती संभाजीनगर : राज्यभरातील दिव्यांग बांधवांसह शेतकरी, कामगारांसाठी प्रहारने पुन्हा एकदा आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. या घटकांच्या प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शुक्रवारी आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वात क्रांतीचौक ते विभागीय आयुक्तालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. यात राज्यभरातून दिव्यांग बांधवांसह २ लाख जण सहभागी होतील, अशी माहिती प्रहार जनशक्ती पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष महेंद्र ऊर्फ बल्लू जवंजाळ यांनी दिली.

राज्यपालांचा ४० एकरात असलेल्या बंगल्याचा लिलाव करावा. त्यातून येणाऱ्या पैशातून कष्टकऱ्यांसाठी योजना राबवाव्यात, या मागण्यांसाठी शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे जवंजाळ यांनी सांगितले. दिव्यांगांना दरमहा ६ हजार रुपये सुरक्षा वेतन, स्वतंत्र घरकुल योजना, विनातारण कर्ज, अंत्योदय योजनेचा लाभ देण्यात यावा. स्वतंत्र विद्यापीठ, संत गाडगेबाबा प्रशिक्षण महामंडळ स्थापन करावे, स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करावी, पेरणी ते कापणीपर्यंतच्या सर्व कामांचा मनरेगात समावेश करावा, कांद्याला हमीभाव देऊन नाफेडचा हस्तक्षेप बंद करावा, कांदा निर्यातबंदी संदर्भात स्वतंत्र धोरण तयार करावे, शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊन कर्जाच्या मुद्दल व व्याजात ५० टक्के सवलत द्यावी, घरकुलासाठी ५ लाख रुपये देण्यात यावे या मागण्यांसाठी हा मोर्चा काढणार असल्याचे जवंजाळ म्हणाले.

यावेळी प्रहारचे मराठवाडा अध्यक्ष जे. के. जाधव, जिल्हाध्यक्ष सुधाकर शिंदे, शहराध्यक्ष कुणाल राऊत, क्रांती आंदोलनचे जिल्हाध्यक्ष शिवाजी गाडे, संजय देशमुख उपस्थित होते.

ओबीसी समाजाचे १०० आमदार निवडून आणावे लागतील - प्रकाश आंबेडकर

छत्रपती संभाजीनगर : ओबीसी आरक्षण हवे की नको हे ओबीसींनाच ठरवावे लागेल. या यात्रेने काय साध्य केले. तर मी म्हणेल की महाराष्ट्रातील शांतता या यात्रेने साध्य केली आहे. जो पक्ष आरक्षण वाचवेल त्याच पक्षाच्या पाठीमागे उभे राहवे लागेल. शरीराने लढायचं नाही, मतांनी लढावं लागेल. १०० आमदार ओबीसी समाजाचे निवडून आणावेच लागतील असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी बुधवारी केले.

आंबेडकर यांच्या ओबीसी आरक्षण बचाव संवाद यात्रेचा समारोप छत्रपती संभाजीनगर शहरातील चिकलठाणा जिमखाना परिसरात बुधवारी दुपारी झाला. ढोल ताशाच्या गजरात पुष्पवृष्टी करत यात्रेचे जंगी स्वागत करण्यात आले. २५ जुलैपासून वंचित बहुजन आघाडीची ओबीसी आरक्षण बचावयात्रा सुरू आहे.

खारघरच्या मेडिकवर हॉस्पिटलमध्ये यशस्वी उपचार

१३ वर्षांच्या मुलीच्या फुफ्फुसातून काढली २.१ इंचाची पिन

नवी मुंबई : चुकून पिन गिळल्याने १३ वर्षीय मुलीच्या फुफ्फुसात अडकलेली २.१ इंचाची पिन खारघर मधील मेडिकवर हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी यशस्वीरित्या बाहेर काढली. मेडिकवर हॉस्पिटलमधील फुफ्फुस विकार तज्ज्ञ डॉ. शाहिद पटेल यांच्या नेतृत्वाखाली टिमने ब्रॉन्कोस्कोपीद्वारे मुलीच्या फुफ्फुसातील पिन यशस्वीपणे बाहेर काढली.

महाराष्ट्रातील राजापूर येथील कृती कुमार (नाव बदलले आहे) या १३ वर्षीय शाळकरी मुलीने ओढणी घालताना चुकून पिन गिळली. यावेळी तिला तातडीने रत्नागिरी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. येथे पिन पोटात आहे की नाही, ते पाहण्यासाठी मुलीवर ओजीडोस्कोपी करण्यात आली. वैद्यकीय तपासणीनंतर मुलीच्या फुफ्फुसात पिन अडकल्याचे निष्पन्न झाले. पण, यामुळे या मुलीला कोणताही त्रास होत नव्हता. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी तिला खारघरच्या मेडिकवर हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले. यावेळी प्रसंगावधान राखत डॉक्टरांच्या टीमने तातडीने ब्रॉन्कोस्कोपी करत फुफ्फुसात अडकलेली पिन बाहेर काढली.

प्रक्रिया ५० मिनिटे चालली

या मुलीला आपत्कालीन स्थितीत रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. वैद्यकीय तपासणीत डाव्या फुफ्फुसाच्या खालच्या भागात पिन अडकल्याचे दिसून आले. यावेळी तिला ताबडतोब आपत्कालीन उपचार देण्यात आले. फुफ्फुसात अडकलेली पिन काढणे आव्हानात्मक होते. मुलगी किशोरवयीन असून तिची श्वासनलिका लहान होती. तसेच पिन डाव्या फुफ्फुसाच्या खालच्या भागात अडकली होती आणि ती अणकुचीदार होती. ही प्रक्रिया जवळपास ५० मिनिटे चालली, अशी माहिती डॉ. शाहिद पटेल यांनी दिली.

निवडक

पोलादपूरमध्ये शुक्रवारी आदिवासी दिन

पोलादपूर : पोलादपूरमध्ये शुक्रवार दि. ९ ऑगस्ट २०२४ रोजी जागतिक आदिवासी दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यातील २३ वाड्यांतील आदिवासी बांधव हा दिन उत्साहात साजरा करणार आहेत. जागतिक आदिवासी दिनानिमित्त शुक्रवारी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत छ. शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा ते बाजारपेठमार्गे भव्य रॅली निघणार आहे. यानंतर रॅलीचे रूपांतर कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये आदिवासी मेळाव्यामध्ये होणार असून यावेळी आदिवासी समाजातील मान्यवर आणि आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. २ वाजून ३० मिनिटांपासून ३ वाजून ३० मिनीटांपर्यंत मान्यवरांचे मार्गदर्शन होणार असून त्यानंतर कार्यक्रमाचा समारोप होणार आहे. तालुका कृषी अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण, पशुवैद्यकीय अधिकारी, श्रमजीवी जनता सहायक मंडळ सातारा, पोलीस निरिक्षक पोलादपूर आदिंना प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे.

घोडबंदर मार्गावर तेल सांडल्याने वाहतूककोंडी

ठाणे : घोडबंदर मार्गावर होणाऱ्या वाहतूक कोंडीचा सामना वाहनचालकांना दररोजच करावा लागत असतो. बुधवारी पहाटे या मार्गावर तेल सांडल्याने सकाळीच या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी झाली होती. तेल सांडल्याने वाहनाचा वेग मंदावला आणि वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने भाईंदर पाडा पासून मानपाडापर्यंत वाहतूककोंडी झाल्याचे पाहायला मिळाले. घोडबंदर मार्गावर वाहतूककोंडी आता नित्याचीच झाली आहे. ददरोज कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे या मार्गावर वाहतूककोंडी होत असून यामुळे वाहन चालकांना रोजचाच मनःस्ताप सहन करावा लागत आहे. बुधवारी पहाटे देखील या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी पाहायला मिळाली. बुधवारी पहाटे तेल सांडल्याने त्याचा परिणाम सकाळपासून जाणवू लागला. भाईंदर पाडा ते मानपाडापर्यंत वाहनांच्या लांब रांगा लागल्या. ठाण्याहून घोडबंदरच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर तेल सांडल्याने ही वाहतूककोंडी झाली होती. त्यामुळे वाहतुकीचा अक्षरशः खोळंबा झाला होता. वाहतूक कोंडीमुळे ठाण्याहून बोरिवली, वसई, भाईंदर, पालघरच्या दिशेने जाणाऱ्या वाहन चालकांचे हाल झाले.

नांदेडमध्ये क्षयरोगमुक्त ग्रामपंचायतींचा गौरव

नांदेड : वर्ष २०२५ पर्यंत संपूर्ण भारत क्षयरोगमुक्त करण्याच्या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेला हाकेस प्रतिसाद म्हणून नांदेड जिल्ह्यातील ८६ क्षयरोगमुक्त झालेल्या ग्रामपंचायतींचा गौरव सोहळा येथील नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, तर व्यासपीठावर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. शिवशक्ती पवार, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड, जागतिक आरोग्य संघटनेचे समन्वयक डॉ. सम्यक खैरे व्यासपीठावर उपस्थित होते.

ऑनलाईन ई-लिलाव मत्तेची विक्री

kotak Kotak Mahindra Bank
कोटक महिंद्रा बँक लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : २७ बीकेसी, सी-२७, जी-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू), मुंबई, महाराष्ट्र, पिन कोड - ४०० ०५१, शाखा कार्यालय : कोटक महिंद्रा बँक लिमिटेड- ५वा मजला, अंडमास प्लाझा, १६६/१६ सीएसटी रोड, कालिना, सांताक्रुझ पूर्व, मुंबई-४०००९८

स्थावर मिळकतींच्या विक्रीसाठी विक्री सूचना

दि सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अंतर्गत नियम ८(५) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ९(१) च्या तरतुदी अन्वये स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.

''एस्सेल फायनान्स बिझनेस लोन्स लिमिटेड'' (यापुढे ''एस्सेल'' म्हणून संदर्भित) द्वारे **कोटक महिंद्रा बँक लिमिटेड**च्या नावे कर्जाच्या अभिहस्तांकनला अनुसरून, कोटक महिंद्रा बँक लिमिटेडच्या (यापुढे ''बँक/ केएमबीएल/सुरक्षित कर्जदार) म्हणून संदर्भित प्राधिकृत अधिकारी यांनी तारण धनको कडे गहाण/प्रभारित खाली नमूद स्थावर मिळकतीचा (यानंतर तारण मत्ता) प्रत्यक्ष कब्जा १३.०४.२०२२ आणि २३.०७.२०२४ रोजी रोजी घेतला आहे.

सर्वसामान्य जनता आणि विशेषत: कर्जदार आणि हमीदार यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, कर्ज खाते क्रमांक एलएनएमयूएम००६१५-१६०००००१३७ अंतर्गत मेसर्स सय्यद शरफुद्दीन, श्रीमान शराफुद्दीन सय्यद (दिवंगत असल्याने) आणि श्रीमती शकिला शराफुद्दीन सय्यद यांनी घेतलेले कर्ज खालील तपशीलानुसार वसुलीपर्यंत भविष्यातील लागू व्याजासह ०६.०८.२०२४ रोजी प्रमाणे १,२०,२३,३४५-/- (रुपये एक कोटी वीस लाख तेवीस हजार तीनशे पंचेचाळीस मात्र) थकबाकीच्या वसुलीसाठी ''जे आहे जसे आहे'', ''जसे आहे तसे आहे'', ''जे काही आहे जसे आहे'' या तत्त्वावर सरफैसी अधिनियम २००२ च्या तरतुदी अंतर्गत ई लिलावामार्फत तारण मत्तेची विक्री करण्याचे ठरविलेले आहे.

तपशील	तपशील
लिलावाची तारीख	१०.०९.२०२४
लिलावाची वेळ	द. ११.०० वा. ते द. १.०० वा. दरम्यान सह ५ मिनिटांचा अमर्यादित विस्तार
राखीव किंमत	रू. ५२,००,०००/- (रूपये बावन्न लाख मात्र)
इसारा अनामत रक्कम (ईएमडी)	रू. ५,२०,०००/- (रूपये पाच लाख वीस हजार मात्र)
केवायसी सह ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख	०९.०९.२०२४, सायं ५.०० वा. (भाप्रवे) पर्यंत
तारण मत्तेचे विवरण	वांद्रेचा उप-नोंदणी जिल्हा आणि बृहन्मुंबई महानगरपालिकच्या हद्दीतील शमसुद्दीन चाळ, काजू वाडी, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई-

४०००९९ येथे स्थित सीएसटी क्र..५२८, ५२८/१ ते ५२८/१७, ५२९/१ ते ३२ आणि ५३५ धारक जमिनीवर उभ्या ''सदभानवा कोऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड'' नावाच्या इमारतीत तिसऱ्या मजल्यावरील मोजमापित सुमारे ५८ चौ.मी. फ्लॅट क्र. ३०४ आणि ३०५ धारक मालमत्तेचा सर्व तो तुकडा आणि पार्सल

ज्ञात बोजा शून्य

तारण मत्ताच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात अॅक्टचे कलम १३ च्या पोट कलम ८ च्या तरतुदीनुसार कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे. विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेनी कृपया नोंद घ्यावी की, जर सदर लिलाव हा कोणत्याही कारणास्तव अयशस्वी झाला तर तारण धनको हे खाजगी पद्धतीने द्वारा विक्रीच्या मार्ग सिक्युरिटी इंटरेस्टची अंमलबजावणी करतील. जर विक्री अन्वये मत्तेसंबधीत कोणतेही स्पष्टीकरण/गरज असल्यास बोलीदारांनी श्री. श्रीतिज अनंत (+९१ ८१४०१११९६५), श्री. अनुज मसीन (+९१ ९७२६४१७२५०) वर संपर्क करावा. स्पष्टीकरणासाठी बोलीदारांनी आयव्हीआर क्र. (+९१-९१५२२१९७५१) येथे देखील संपर्क साधू शकतात. विक्रीच्या तपशिलवार अटी व शर्तीसाठी कृपया कोटक महिंद्रा बँकची वेबसाईट म्हणजेच www.kotak.com आणि/किंवा https://bank-auctions.in येथे पुरविलेल्या: https://www.kotak.com/en/bank-auctions.html चा संदर्भ घ्यावा.

स्थळ : वांद्रे, दिनांक : ०८.०८.२०२४

प्राधिकृत अधिकारी
कोटक महिंद्रा बँक लिमिटेड करिता